# जनकल्याण समितीला 'क्विक हिल'तर्फे रुग्णवाहिका

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** ग्रामीण भागातील आरोग्य सेवा वाढवण्याच्या उद्देशातून क्विक हिल फाउंडेशन या क्विक हिल टेक्नोलॉजीजच्या सीएसआर शाखेने पनवेल येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीच्या 'आरोग्य यान' उपक्रमासाठी रुग्णवाहिका दान केली.

रायगड जिल्ह्यातील आदिवासींना आरोग्य सेवा पुरवण्यासाठी या रुग्णवाहिकेचा उपयोग केला जाणार आहे.

क्विक हिल टेक्नोलॉजीजचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश काटकर, क्विक हिलच्या सीएसआर उपक्रम आणि आरोग्य यान उपक्रमाच्या प्रणेत्या अनुपमा काटकर आणि पनवेल शहराचे उपायुक्त विठ्ठल डाके, सहायक आयुक्त धैर्यशील जाधव, रा. स्व. संघ जनकल्याण समिती महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर आणि सहकार्यवाह विनायक डंबीर यांच्या उपस्थितीत रुग्णवाहिका भेट देण्यात आली.

काटकर म्हणाले, क्विक हिलचे अत्याधुनिक 'आरोग्य यान' रायगड जिल्ह्यातील आदिवासी भागातील लोकांना सेवा देईल. अति दुर्गम भागातील डॉक्टर आणि रुग्णांना प्रवासासाठी ही रुग्णवाहिका उपयुक्त ठरेल.

रायगड जिल्ह्यातील वंचितांच्या विकासाकरिता रा. स्व. संघ जनकल्याण समितीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे